Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC

# ‘बारोमास’ कादंबरीतील दुष्काळाचे चित्रण

**प्रा. नाईक शशिकला बळीराम,** सहा. प्रा. मराठी विभाग, न. ता. वि. समितीचे गजमल तुळशीराम पाटील कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नंदुरबार

**संशोधनाचा हेतू**

पाणीटंचाईमुळे तसेच अनियमित पावसामुळे पडणाऱ्या दुष्काळाची जाणीव वरील कादंबरीतून करून देणे.

**संशोधन पद्धती**

वरील विषयात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट**

१) पाणी हा जीवनावश्यक घटक असून पाण्याअभावी शेती आणि मनुष्य जीवन कसे उध्वस्त होते त्याची माहिती कादंबरीतून कथानकाच्या माध्यमातून करून देणे.

२) शेती ही पूर्णत: पावसावर अवलंबून असते परंतु सतत दुष्काळ शेतकऱ्याला कसा कर्जबाजारी करतो हे कादंबरीतून चित्रित करणे.

३) पाण्याअभावी नुसती शेतीच नाही तर शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, बेकारी त्यातल्या त्यात वाढत जाणारा भ्रष्टाचार याला आळा घालणे किती आवश्यक आहे हे पटवून देणे.

४) ‘बारोमास’ कादंबरी ही नुसती दुष्काळाचेच चित्रण करत नाही तर वर्तमान परिस्थितीत दुष्काळावर कशी मात करता येईल याचा विचार करायला भाग पाडते.

५) वरील कादंबरी ही शेतकऱ्याला ज्या परिस्थितीतून वाटचाल करावी लागते ज्या प्रसंगांना आणि आव्हानांना त्याला सामोरे जावे लागते, ती आव्हाने, ते प्रश्न या कादंबरीतून अधोरेखित करणे.

६) दुष्काळामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या विशेषत: विदर्भ - मराठवाड्याकडच्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नये त्यासाठी शासनस्तरावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. उदा. सध्या शेतकऱ्यांना मिळणारी नुकसान भरपाई शासनाकडून मिळत असून अशाच उपाययोजना भविष्यात केल्या जाव्यात जेणेकरून शेतकरी आत्महत्या थांबतील.

**प्रस्तावना**

भूपृष्ठावरील पाणी व भूगर्भातील पाणी याचे अस्तित्व हे पर्जन्य प्रमाणावर अवलंबून असते. पर्यावरण प्रदूषण व वृक्षतोड यामुळे पर्जन्य हा लहरी व अनिश्चित झालेला आहे. त्यामुळे पाण्याची गरज भागविण्यासाठी पाणी अडवा पाणी जिरवा मोहीम राबविणे आणि पाण्याचे संवर्धन करणे ही आज काळाची गरज आहे. त्यासाठी जलसंवर्धन, जलनियोजन, जल व्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास आदी संबंधी विविध पद्धती लाभविल्या गेल्या पाहिजेत. जगात, भारतात व महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी दुष्काळाची जळ पोहचते. अशा दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी आज जल व्यवस्थापनाची गरज आहे. १९७२ पूर्वी भूगर्भजलाचा साठा भरपूर होता. पण त्यानंतर भूगर्भातील पाणी उपशाचे प्रमाण वाढले कारण पाण्याची गरज ही दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. (संदर्भ :- साधन व जलसंपदा भूगोल पृ. १७०)


Copyright © | JET Network, All Rights Reserved

वाढत्या लोकसंख्येबरोबर पाण्याची वाढती गरज त्यामुळे जल व्यवस्थापन केले पाहिजे. तळी खोदणे, जलयुक्त शिवार, डोंगरमाथ्यावरील पाणी अडविणे आदी योजना राबविल्या जाऊ लागल्या. घरगुती वापरापासून ते औद्योगिक वापरापर्यंत विविध अशा सर्व क्षेत्रात पाण्याची गरज असून त्याचे संवर्धन केले गेले पाहिजे. नाहीतर थोड्याच अवधीत पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल. (संदर्भ :- साधन व जलसंपदा भूगोल पृ. १७२ प्रशांत पब्लिकेशन)

**बीजशब्द** - शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा, बेरोजगारी, आर्थिक ओढाताण, भ्रष्टाचार, दुष्काळाचे दुष्परिणाम इ.

**कादंबरीचे आशयसूत्र**

'बारोमास' ही सदानंद देशमुखांची ग्रामीण कादंबरी २००२ साली प्रकाशित झाली. दुष्काळामुळे बारोमास कादंबरीचा नायक एकनाथ हा परिस्थितीमुळे लाच न देता आल्याने पुन्हा शेतीवर उदरनिर्वाह करतो. एक भाऊ शेतीवर उदरनिर्वाह करतो तर दुसरा अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकतो. कष्ट न करता पैसे पैसे मिळवण्याच्या मागे लागतो याबरोबरच यांत्रिक शेती, सेंद्रिय खताचा वापर, नापिकी जमिनीची मशागत करणे, वनशेती, फडशेती, सेंद्रिय शेती, निसर्ग शेती यासारख्या अनेक विषयांना तितक्याच वेधकपणे मांडले आहे. थोडक्यात ग्रामीण शेतकरी जीवन कसे उध्वस्त होते. हे कादंबरीचे आशयसूत्र आहे.

**'बारोमास' या कादंबरीचे कथानक**

या कादंबरीत पारंपारिक शेती आणि आज जीवन आज शिक्षण घेऊन बेकार बनलेला तरुण जेव्हा शेती करू लागतो तेव्हा त्याच्या शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. तो नरूभाऊंच्या शेतकरी संघटनेत सहभागी होतो. एकनाथाचे वडील सुभाना आणि त्यांचे वडील नानू आज्जा हे जुन्या पारंपारिक शेती संस्कृतीचे पाईक होते. शेतीला माऊलीच्या रूपात पाहत होते एकनाथ मात्र नवी दृष्टी घेऊन शेती करू लागतो. आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान तो आत्मसात करतो एकनाथने कॉलेजमध्ये नोकरी मिळविण्यासाठी अनेक ठिकाणी प्रयत्न केले. पण नोकरीसाठी त्याच्याकडे एक लाख रुपये डोनेशन मागितले जाते ते भरण्याची क्षमता त्याचे वडील सुभानाची नसते. त्यामुळे त्याला नोकरी लागत नाही. एकनाथचे लग्न अलकाशी होते. मोहाडी सारख्या शहरातील वाढलेली असते तिचे शिक्षण बी.एस्सी. पर्यंत झालेले असते आज ना उद्या एकनाथ ला नोकरी लागेल असे तिला वाटते. पाच सहा वर्ष निघून जातात त्याला नोकरी काही लागत नाही शेतीमध्येच कष्ट करीत राहतो. अलकाला सांजोळच्या जुन्या मोडकळीस आलेल्या वाड्यात राहायला नकोसे वाटते. रोजचे जेवण करण्यासाठी सरपण या घरात मिळत नाही. सूर्यफुलाच्या काडावर तिला जेवण करावे लागत होते. अशा पद्धतीने चूल पेटवायची तिला सवय नसल्यामुळे तिचे डोळे धुराने भरून येत होते. घरात वेळेवर चहाला साखर मिळत नाही. तीन-चार दिवस भुई सारवली तरी ती उखनलेलीच राहते. शेवंता ही सासू जुन्या वळणाची होती. तिची सारखी कटकट सुरू असायची. शेवंतामाय ही जुन्या परंपरागत विचारांना चिटकून राहणारी होती. शेती संस्कृतीशी तिचे नाते जिव्हाळयाचे होते. शहरात वाढलेल्या अलकाला मात्र या संस्कृतीशी जुळवून घेता येत नाही.

दोनेक वर्षातून एकदा तरी पाऊस दडी मारतो, दुष्काळ पडतो. त्यामुळे शेतीतून पुरेसे धान्य निघत नाही. दुबार पेरणीच्या वेळेला दगडू महाकाळ कडून कर्ज काढावे लागते ते फेडताना नाकीनऊ येतात. अलकाची पोत शेतीसाठी पैसे कमी पडले म्हणून एकदा जी विकली जाते. ती पुन्हा करणे जमले नाही. त्यामुळे अलकाला या घरची आर्थिक परिस्थिती किती ढासळलेली आहे याची जाणीव झाली. शेवंतामायचे सगळेच दागिने या शेतीच्या गरजांकरिता म्हणून मोडले, ते कायमचे गेले. किनखेडच्या रावसाहेब

 Copyright © | JET Network, All Rights Reserved

पाहुण्याने सावकाराकडून काढलेले कर्ज आणि त्याचे व्याज भरता आले नाही म्हणून चिंचेच्या झाडाला गळफास घेतला. अलकाच्या सोन्याच्या बांगड्या शेवंतामाय पैशासाठी मागते. अंगाला लावायचा साबण घरात नसतो. मधु अलकाच्या सुटकेसमधील साबण दांडगाव्याने घेतो. तेव्हा तिला त्याच्या राग येतो. स्वतःच्या पैशाने साबण आणता येत नाही का म्हणते तो मी माझ्या बापाकडून आणला. तो घ्यायला का लाज वाटत नाही काय? असे म्हणून त्याच्यापुढे येते. तो तिला चापट मारतो. ती दंगा करते. बेशुद्ध पडते घर सोडून कायमचीच माहेरी निघून जाते. मधु आणि एकनाथची भांडणे होतात मधुची शरीरयष्टी बळकट असल्यामुळे एकनाथला मार बसतो. मधु हा कामधंदा न करता मोकाट फिरतो. त्याचे सर्वांशी वागणे बेफिकीरीचे असते. सोनेरी टोळी घेऊन रात्रीचे धन उकरायला जातो. घरात कोणत्याच कामाला मदत करीत नाही. उलट तो घरच्यांना त्रास देतो. अलकावर हात उगारल्यावर गावातल्या इतर बायकाही त्याच्या बाबतीत बोलायला घाबरतात.

मधु सुभानराववर नोकरीसाठी कल्याणीच्या मळयावर दोन लाख काढण्यासाठी दबाव आणतो. तो अंथरून घालूनच झोपतो. शेवटी दगडू महाकाळ करून दोन लाख रुपये काढून त्यातले एक लाख रुपये उत्तम ठोकरेकडे सुरेश साठेमार्फत मधू देतो. उत्तम ठोकरे मालपाणी आमदाराचा एजेंट असतो. मधुला नोकरी लागत नाही. उत्तम ठोकरेचा आमदार कुणाकडून तरी अपघात घडवून आणतो त्यामध्ये तो मरतो. दिलेले पैसे बुडतात कल्याणीच्या मळा दगडू महाकाळच्या ताब्यात जातो कल्याणीचा मळा हातातून गेल्यामुळे सुभानाला काहीच सुचत नाही. सुभाना एन्ड्रीनचे विष पितो. त्याचे विष उलट्या करून बाहेर पाडतात. मात्र त्याला कल्याणीचा मळा गेल्यामुळे जगण्यात रस वाटत नाही. पुन्हा तो काही दिवसांनी जांभळकाठच्या डोहात उडी टाकून जीव देतो. सावकाराच्या कर्जात कल्याणीचा मळा केल्यामुळे सुभाना आत्महत्या करतो. त्याच्या आत्महत्येने कादंबरीच्या शेवट होतो.

मनाला अस्वस्थ करणारा हा दुःखद शेवट आहे. ही कादंबरी दुःख, कष्ट, वेदना आणि दारिद्रय याची भीषण चित्रण करणारी आहे.

आज बदलत्या समाजजीवनात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलांना शिक्षण देऊन चांगले बनविण्याच्या प्रयत्न करणाऱ्या सुभानरावाच्या मृत्यू शोकात्मकरित्या झाला. आजची आधुनिक शेती त्याला स्थैर्य मिळवून देत नाही. आजच्या धकाधकीच्या आणि भ्रष्टाचाराने भरलेल्या समाजात त्याला जीवनाच्या शेवट करावा लागतो. आधुनिक सोयी, सुविधा खेड्यातील लोकांपर्यंत पोहचल्या तरी त्याच्या उपयोग सामान्य शेतकऱ्याला होत नाही दुष्काळ, अवर्षण हे विदर्भातील शेतकऱ्याला सतत सोसावे लागतात परिणामी कर्जाच्या बोझ्याने त्रस्त झालेल्या शेतकरी हा आत्महत्येच्या मार्ग स्वीकारतो. सुभानाच्या मृत्यू हा बळी गेलेल्या शेतकऱ्याच्या मृत्यू आहे. (संदर्भ : मराठी कादंबरी समीक्षा पृ. क्र. १५३ डायमंड पब्लिकेशन)

**'बारोमास' मधील वातावरण**

विदर्भातल्या सांजोळ गावचे चित्र या कादंबरीत रेखाटले आहे. हे गाव आणि गावातील विविध व्यक्तिरेखा त्यांच्यातील परस्परसंबंध सहजपणे व्यक्त होतात. तलाठी, ग्रामसेवक, बँक अधिकारी, सरपंच, आमदार ही मंडळी भ्रष्ट कारभार करतात. गावातील सर्वसामान्य शेतकऱ्याला व त्यांच्या मुलांना फसवितात. ही लोकशाहीत चाललेली फसवणूक देशमुख वास्तव्याच्या रूपात मांडतात विदर्भातील सर्वसामान्य शेतकरी कुटुंब या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. नोकरीच्या अमिषाने दगडू महाकाळकडे जमिनी गहाणखत म्हणून लोक देतात. त्यांचे संबंध हे मालपाणी आमदाराशी असतात. कुणाचे काम


Copyright © | JET Network, All Rights Reserved

करायचे, कोणाला मातीत घालायचे हे तोच ठरवित असतो. 'सांजोळ' गावचे सामाजिक, सांस्कृतिक वातावरण या कादंबरीत व्यक्त होते. तसेच ही कादंबरी सुभानच्या कुटुंबाची शोकांतिका मांडते. आज सर्वात मोठ्या प्रमाणात विदर्भात आत्महत्या होत आहेत. त्या आजच्या वर्तमान प्रश्नाला देशमुख यांनी 'बारोमास' कादंबरीत प्रकाश टाकला आहे. (संदर्भ :- मराठी कादंबरी समीक्षा डायमंड पब्लिकेशन पृ. क्र. १६४)

**बदलत्या ग्राम जीवनाचे चित्रण**

सुभानराव आणि शेवंता हे दोघे नवरा बायको शेतीमध्ये कष्ट करीत जगले. नानू आजानेही या शेतीवर जीव लावला. त्यांच्या पाठीमागच्या पिढ्या सुद्धा या शेतीत राबवत आल्या. एकनाथ, अलका आणि मधु ही पिढी मात्र या शेतीत रमू शकली नाही. शिक्षणाने त्यांची मने नोकरीच्या शोधासाठी भरकटली. अलका ही शहरात वाढलेली असल्यामुळे तिला शेतीबद्दल जिव्हाळा कधीच वाटला नाही. त्यामुळे ती एकनाथबरोबर प्रपंचात रमू शकली नाही. तिला भौतिक सुखाचा, सुखसोयींचा हव्यास जडला होता. त्याशिवाय ती जगू शकत नाही पारंपरिक शेती ही किती तोट्याची आहे. याचा हिशेब शेतकरी संघटनेत मांडला होता आजच्या बदलत्या पिढीत शेतकऱ्यांसमोर असलेली आव्हाने, शेतमालाला योग्य भावना मिळणे त्यामध्ये सर्वसामान्य शेतकरी हा व्यापारांकडून कसा नागवला जातो याचे अनुभव एकनाथने स्वतः घेतले होते. आधुनिक जीवनाच्या स्पर्धेत शेतकरी हा मागे पडतो आहे. शिक्षण हे दिवसेंदिवस महाग होत चालले आहे. शिक्षण संस्थेत विशिष्ट लोकांची मक्तेदारी वाढली आहे. त्यामुळे नोकरी मिळेल याचा भरवसा नाही. नोकरी मिळवण्यासाठी डोनेशन द्यावे लागते.

विदर्भातील शेतकरी हा सततच्या दुष्काळामुळे कर्जबाजारी बनला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्याची परिस्थिती ही फारशी वेगळी नाही. ग्रामीण जीवनात नव्या आधुनिक सुविधा येत आहेत. मात्र त्या शेतकऱ्याला परवडत नाही शेतकरी हा अनेक प्रश्नांनी आणि समस्यांनी ग्रस्त झालेला आहे.

ही कादंबरी नुसते शेतीतील समस्यांचे दुष्काळाचे चित्रण करीत नाही तर बेकारी, सुशिक्षित बेरोजगार तरुण पिढीच्या उध्वस्त होणाऱ्या जीवनाचे ही चित्रण करते.

**'बारोमास' सद्यस्थितीतील वास्तवावर प्रकाश टाकणारी कादंबरी**

सध्या ऋतुमानातील बदलामुळे पाऊस वेळेवर पडत नाही पडलाच तर काही ठिकाणी ओला दुष्काळ तर काही ठिकाणी कोरडा दुष्काळ पडतो त्यातच सध्याची शेती ही आधुनिक पद्धतीची व खर्चिक झालेली आहे. 'बारोमास' म्हणजे बाराही महिने पडणारा दुष्काळ, बँकेचे कर्ज, भ्रष्टाचार यामुळे शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. नुसत्या मराठवाडा विदर्भ नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकऱ्याच्या अडचणी दूर होण्याऐवजी वाढत आहेत. तसेच शेतकऱ्यांची शिकलेली मुले नोकरी मिळवण्यासाठी धडपडताना दिसतात त्यांना वडिलोपार्जित शेती पिकवण्यात स्वारस्य वाटत नाही. चंगळवादी अशी ही पिढी शहरी जीवन जगण्यात रस मानते. 'बारोमास' कादंबरीतील एकनाथची पत्नी 'अलका' या पिढीचे प्रतिनिधित्व करते. तर दुबार पेरणीच्या संकटापायी अनेक शेतकरी प्राणाला मुकताना दिसतात. दुष्काळामुळे पुरेसे धान्य पिकत नाही. बँकेतून काढलेल्या कर्जावर व्याज वाढल्यामुळे शेतकऱ्याला बँकेचे कर्ज फेडणे शक्य होत नाही. शेवटी आत्महत्या करणे हा एकच मार्ग या शेतकऱ्यापुढे असतो. 'बायोमास' कादंबरीतील दगडू महाकाळ हा पेरणीच्या वेळी भरमसाठ व्याजाने कर्ज काढतो ते कर्ज फेडता न आल्याने शेवटी आत्महत्या करतो. एकनाथला शिक्षण


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC

असूनही शेवटपर्यंत नोकरी मिळत नाही. शेवंता मायसारखी जुन्या परंपरागत स्त्रिया मात्र शेतीवर प्रेम करताना दिसतात पण त्यांच्या मुलांना शेती नकोशी होते.

सध्या शेतकरी ज्या संकटातून जात आहे. त्यावर भाष्य करणारी व प्रकाश टाकणारी ही कादंबरी आहे.

**समारोप**

'बारोमास' ही सदानंद देशमुख यांची साहित्य अकादमी (२००४) पुरस्कार प्राप्त कादंबरी विदर्भातील बाराही महिने पडणाऱ्या दुष्काळाचे भीषण चित्रण करते. मोहाडी तालुक्यातील सांजोळ हे गाव व त्या भोवतालच्या ग्रामीण परिवेश यावर ती आधारित आहे. या कादंबरीत तीन पिढ्यांचे चित्र आलेले असून नानूआजा पारंपारिक पद्धतीने शेती करणारा सुभानराव हा त्याचा मुलगा पुढे हायब्रीड बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांच्या साह्याने शेती करू लागतो. तर तिसऱ्या पिढीतील एकनाथ हा एम. ए. बी. एड. झालेला असून त्याला व त्याचा भाऊ मधू यांना शेती करण्याचा रस वाटत नाही. अशा तीन पिढ्यांचे प्रातिनिधिक चित्रण ही कादंबरी करते. तसेच दुष्काळाचे गंभीर भीषण परिणाम ही या कादंबरीत चित्रित झालेले आहे.

**निष्कर्ष**

१) दुष्काळामुळे होणाऱ्या शेतकरी आत्महत्या थांबल्या पाहिजेत.

२) तरुण पिढीच्या मनात शेतीबद्दल असलेली उदासीनता दूर करून आधुनिक पद्धतीने पण कमी खर्चात शेती कशी करता येईल यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

३) आजच्या शेतीपुढे शेतकरी आत्महत्या, बेकारी, भ्रष्टाचार अशी असंख्य आव्हाने आहेत.

४) आजची सुशिक्षित पिढी ही शेतीपासून आणि माती पासून लांब जावून चंगळवादाच्या आहारी जाताना दिसते.

५) शेती संस्कृती ही शहरी संस्कृतीशी जुळवून घेताना दिसत नाही दोघांमध्ये तफावत दिसते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१) साधन व जलसंपदा भूगोल (प्रशांत पब्लिकेशन्स)
२) महाराष्ट्राचा भूगोल (प्रशांत पब्लिकेशन्स)
३) मराठी कादंबरी : समीक्षा प्रा. डॉ. तानाजी राऊ पाटील (डायमंड पब्लिकेशन्स)
४) 'बारोमास' कादंबरी :- लेखक सदानंद देशमुख
५) 'बारोमास' कादंबरी :- सदानंद देशमुख (कॉन्टिनेन्टल प्रकाशन - २००२)


Copyright © | JET Network, All Rights Reserved